bluebytes
news that matters

पुढारी

Friday, November 06, 2009

**Pictorial warnings on tobacco products ineffective!**

Publication: Pudhari, Edition: Mumbai, Supplement: My Mumbai, Journalist: Bureau, Page No: IV, Location: Bottom-Center, Width(cms): 25, Height(cms): 8, Size(sq.cms): 200

# तंबाखू उत्पादनावरील इशारे ठरताहेत प्रभावहीन

❖ प्रतिनिधी

व्यसनमुक्त देश होण्यासाठी कायदे बनवून सरकारने देशपातळीवर जरी आटोकाट प्रयत्न केले असेले तरी कायद्याची अंमलबजावणी मात्र तेवढ्या प्रमाणात होत नाही. आजच्या घडीला धुम्रपान करणाऱ्यांची संख्या वाढतच आहे. दोन वर्षापूर्वी सार्वजनिक ठिकाणी धुम्रपान करण्यास सक्त मनाईचा कायदा जरी केला असला तरी अजूनही शाळा, हॉस्पिटल, रेल्वे आणि इतर सार्वजनिक ठिकाणी धुम्रपान करणाऱ्यांची संख्या कमी नाही.

वाढत्या धुम्रपानाला आळा कसा घालता येईल? यावर हेलिस सेखरिया इन्स्टिट्युट संस्थने जवळपास २००४ पासून देशपातळीवर संशोधन करून याप्रश्नाचे उत्तर शोधून काढले आहे.

संस्थने केलेल्या संशोधन अहवालावरून तंबाखू पाकीटावरील छापलेले लहान इशारावजा मजकूर आणि चित्रेच धुम्रपानास कारणीभूत असल्याचे निदर्शनास आले आहे. एकूण लोकसंख्येच्या ५३.२ टक्के पुरुष आणि २३.१ टक्के महिला तंबाखूच्या पाकीटावरील धुम्रपानविरोधी छापलेल्या सूचना वाचूनदेखील धुम्रपान करतात. यासंबंधीची माहिती संस्थेचे संचालक डॉ. पी सी गुप्त यांनी मुंबई मराठी पत्रकार संघात आयोजित केलेल्या पत्रकार परिषदेत दिली. यावेळी सलाम बॉम्बे फाऊण्डेशनच्या संचालिका सीमा सूड उपस्थित होत्या.




**हेलिस सेखसरीया इन्स्टिट्युट फॉर पब्लिक हेल्थ संस्थेचा दावा**

यावेळी डॉ. पी सी गुप्त म्हणाले की, तंबाखूच्या पाकीटावरील असणारे इशारे हे प्रभावहीन झाल्याचे निर्शनात आले आहे. एवढेच नव्हे तर धुम्रपान करणाऱ्या व्यक्ती ह्या मूळ विषयाचे गांभीर्य लक्षात न घेता आपल्यापरीने समजावून घेतात. त्यामुळे या जाहिराती निरूपयोगी ठरतात.

परदेशात धुम्रपानासंबधी सक्त कायदे आहेत. त्यामानाने आपल्या देशात कायदे असूनही त्याची अंमलबजावणी म्हणावी तितकी होत नाही. असे का घडते आणि लोकांचा एवढा धुम्रपानाकडे वळण्याचा दृष्टिकोन का आहे? यावर संस्थेने देशपातळीवर संशोधन करून ३१ मे २००९ पर्यंतचा एक अहवाल तयार केला आहे. त्या अहवालानुसार तंबाखू उत्पादनावरील चित्रमय वैधानिक इशारा हा केवळ कायद्याच्या उल्लंघनापूरताच मर्यादित राहिला नाही तर मोठ्या प्रमाणावर प्रभावहीन बनला आहे. तंबाखू उत्पादनाच्या बहुतांश पाकीटांच्या ४० टक्के क्षेत्राच्या बाहेर धुम्रपानविरोधी सूचनांची लेबल आहेत तर अनेक ठिकाणी वास्तविक प्रदर्शनीय भागाच्या केवळ १० टक्के भागावरच प्रदर्शित झाली आहेत. त्यावरील बहुतेक इशारे हे इंग्रजीतून असल्याने अनेकांना ते समजून घेता येत नाहीत. त्यामुळे अशा स्वरूपाचे इशारे देणारे संकेत अथवा चित्र मोठे असावे आणि मानवी मनावर त्याचा खोलवर प्रभाव पडावा अशा स्वरूपाची असावेत, अशीच मागणी एका निवेदनाद्वारे शासनाला दिली असल्याचे संस्थेचे संचालक डॉ. पी. सी. गुप्त यांनी सांगितले. शासनाचा यावर लवकरच निर्णय होईल, असेही ते म्हणाले.